**२८) माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता :**

१) माजी सभासदांची जबाबदारी अथवा मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता येणे असलेल्या रक्कमेपोटी पुढीलप्रमाणे राहील.

अ) माजी सभासदांच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे राहिल.

ब) मृत्यू पावलेल्या सभासदाचे बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे राहिल.

२) ज्यावेळी कायद्यानुसार बँकेस बँकींग व्यवसाय गुंडाळण्याचा आदेश मिळेल त्यावेळी माजी सभासदांची जबाबदारी व आदेशाचे तारखेपूर्वी दोन वर्षाचे आत मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता अवसायनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील. परंतू ही जबाबदारी सभासदत्व संपुष्टात येणे किंवा मयत तारखेला जे बँकेचे देणे असेल त्या मर्यादेएवढी राहील.

**२९) सभासदाचे भाग भांडवल, लाभांश व ठेवीवरील बँकेचा हक्क :**

सभासदाचे अगर माजी सभासदाचे बँकेचे येणे असेल तर त्यापोटी बँकेत सभासदाचे असलेल्या सर्व भागावर, लाभांशावर व ठेवीवर बँकेचा प्रथम अग्रहक्क व बोजा राहील. बँक केव्हाही त्याच्या जबाबदारीपोटी त्याला देय असलेली रक्कम परस्पर वळती करुन घेऊ शकेल.

**३०) भाग वर्ग करणेबाबत :**

१. एखाद्या सभासदास त्याने धारण केलेले एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाचे नावाने वर्ग करता येईल. मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील त्यांचे नाव भागाच्या रजिस्टरमध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी शुल्क म्हणून रक्कम रु.१००/- भरावी लागेल. खालील कारणासाठी भाग वर्ग करणे नाकारले जाईल.

अ) जर सभासदांवर कर्जाचा बोजा/अगर जामीनकीची/मान्यतेची जबाबदारी असेल तर,

ब) जर भाग वर्ग करणे बँकेच्या हितसंबधास हानीकारक असेल तर.

क) ज्या व्यक्तीचे नावांवर भाग वर्ग करावयाचे असतील ती व्यक्ती पोटनियम नं.११ मधील तरतूदी पूर्ण करत नसली तर.

ड) जर सभासदास धारण केलेले सर्व भाग वर्ग करावयाचे नसतील तर.

**३१) सर्वसाधारण सभा :**

१) बँकेच्या सामान्य व क्रियाशील सभासदांचा समावेश सर्वसाधारण सभेत होईल.

२) कायदा व नियम यांचे अधीन राहून बँकेचे व्यवहाराबाबतचे सर्व अंतिम अधिकार सर्व साधारण सभेकडे राहतील.